नियमीत दिवाणी दावा क्र.११/२०२१.
भागिरथाबाई वि. महाराष्ट्र शासन
वादीतर्फे सा.क्र.३(नि.क्र.७२)

**शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नांव:-प्रतिक रमेशराव चांदेकर,वय:-३५** वर्षे,

**व्यवसाय:-** नोकरी, **रा.**चांदूर रेल्वे, अमरावती, हा.मु. शिरुर ताजबंद.

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.आर.आर.विहीरे यांच्यामार्फत सुरु.**

**१.** मी महाराष्ट्र ग्रामीण बॅक शिरुर ताजबंद येथे शाखा अधिकारी म्हणून ३०/०६/२०२५ पासून कार्यरत आहे. नामदेव माधवराव आकनगीरे यांचे बचत खाते क्र.५४३३०००३८८८ हे आहे. आजरोजी मी या खात्याचे २०२०-२०२१ पासून ते जून-२०२५ पर्यंतचा खाते उतारा आणला आहे. दि.०४/१२/२०२० रोजी स्टेट बॅक ऑफ इंडीया येथे प्रविण रामराव फुलमंटे यांच्या त्या बॅकेतील खाते क्र.६२१८६८९९५८१ या खात्यावर रुपये ३,००,०००/- वर्ग झाले. त्याचे व्हाउचर मी आजरोजी आणले आहे. त्याची सत्यप्रत याकामी दाखल केलेली आहे. मुळ प्रतीप्रमाणे सदरची प्रत योग्य व बरोबर आहे. त्यावर नामदेव आकनगीरे यांची सही आहे. त्यावर आमच्या बॅकेच्या अधिकाऱ्याची सुध्दा सही आहे. सदरची रक्कम त्यात लिहिलेल्या खात्यावर वर्ग झाली आहे. सदर व्हाउचरला **नि.क्र.७३** देण्यात आली. त्याची दुसरी नोंद नामदेव आकनगीरे यांच्या आमच्या बॅकेतील खात्याला झालेली आहे.

**२.** दि.०८/१२/२०२० रोजी रक्कम रुपये १,५०,०००/- कविता प्रविण फुलमंटे यांच्या खात्यावर वर्ग झाले. त्याचे व्हाउचर मी आजरोजी आणले आहे. त्याची सत्यप्रत याकामी दाखल केलेली आहे. मुळ प्रतीप्रमाणे सदरची प्रत योग्य व बरोबर आहे. त्यावर नामदेव आकनगीरे यांची सही आहे. त्यावर आमच्या बॅकेच्या अधिकाऱ्याची सुध्दा सही आहे. सदरची रक्कम त्यात लिहिलेल्या महाराष्ट्र ग्रामीण बॅक, शाखा शिरुर ताजबंद येथील खात्यावर वर्ग झाली आहे. सदर व्हाउचरला **नि.क्र.७४** देण्यात आली. त्याची दुसरी नोंद नामदेव आकनगीरे यांच्या आमच्या बॅकेतील खात्याला झालेली आहे.

**३.** दि.०७/१०/२०२१, ३०/११/२०२१ आणि ०२/१२/२०२१ रोजी अनुक्रमे येणगे सोमण भानूदास याने रुपये ३,००,०००/- आणि नामदेव आकनगीरेने स्वत: रुपये २,००,०००/- आणि त्याची पत्नी मंगला हिने रुपये ५,००,०००/- असे नामदेव आकनगीरेच्या खात्यावर वर्ग केले. त्यांच्या नोंदी या खात्याला झालेल्या आहेत.

**४.** दि.०३/१२/२०२१ रोजी नामदेव आकनगीरे यांनी त्यांच्या खात्यातून रुपये १०,००,०००/- काढून त्यांची पत्नी मंगला हिच्या आमच्या बॅकेतील खाते क्र.००५४३३००२२३०३ या खात्यावर वर्ग केले. सदर १०,००,०००/- रक्कमेचे व्हाऊचर आजरोजी मी आणले आहे. त्याची सत्यप्रत याकामी दाखल केलेली आहे. मुळ प्रतीप्रमाणे सदरची प्रत योग्य व बरोबर आहे. त्यावर नामदेव आकनगीरे यांची सही आहे. त्यावर आमच्या बॅकेच्या अधिकाऱ्याची सुध्दा सही आहे. सदरची रक्कम त्यात लिहिलेल्या खात्यावर वर्ग झाली आहे. सदर व्हाउचरला **नि.क्र.७५** देण्यात आली. त्याची दुसरी नोंद नामदेव आकनगीरे यांच्या आमच्या बॅकेतील खात्याला झालेली आहे.

**५.** दि.११/०१/२०२२ रोजी नामदेवच्या आमच्या बॅकेतील खात्यावर मंगलाच्या आमच्या बॅकेतील खाते क्र.००५४३३००२२३०३ या खात्यावरुन रुपये १०,००,०००/- वर्ग झाले. त्याचे व्हाऊचर आजरोजी मी आणले आहे. त्याची सत्यप्रत याकामी दाखल केलेली आहे. मुळ प्रतीप्रमाणे सदरची प्रत योग्य व बरोबर आहे. त्यावर मंगला आकनगीरे यांची सही आहे. त्यावर आमच्या बॅकेच्या अधिकाऱ्याची सुध्दा सही आहे. सदरची रक्कम त्यात लिहिलेल्या खात्यावर वर्ग झाली आहे. सदर व्हाउचरला **नि.क्र.७६** देण्यात आली. त्याची दुसरी नोंद नामदेव आकनगीरे यांच्या आमच्या बॅकेतील खात्याला झालेली आहे.

**६.** दि.१४/०१/२०२२ रोजी रक्कम रुपये ६,००,०००/- नामदेवच्या खात्यावरुन त्याच्याच स्टेट बॅक ऑफ इंडीया, शाखा शिरुर ताजबंद येथील खाते क्र.६२४७३२००९१९ वर वर्ग झाले. त्याचे व्हाऊचर आजरोजी मी आणले आहे. त्याची सत्यप्रत याकामी दाखल केलेली आहे. मुळ प्रतीप्रमाणे सदरची प्रत योग्य व बरोबर आहे. त्यावर नामदेव आकनगीरे यांची सही आहे. त्यावर आमच्या बॅकेच्या अधिकाऱ्याची सुध्दा सही आहे. सदरची रक्कम त्यात लिहिलेल्या खात्यावर वर्ग झाली आहे. सदर व्हाउचरला **नि.क्र.७७** देण्यात आली. त्याची दुसरी नोंद नामदेव आकनगीरे यांच्या आमच्या बॅकेतील खात्याला झालेली आहे. त्याचा आर.टी.जी.एस. फॉर्म आणलेला आहे. त्यावर नामदेव व आमचे अधिकारी यांची सही आहे. सदर आर.टी.जी.एस. फॉर्मला **नि.क्र.७८** देण्यात येते.

**७.** दि.१६/०६/२०२० रोजी नामदेव आकनगीरे यांच्या खात्यावर रुपये

४,००,०००/- हे आय.डी.बी.आय. बँकेतून वर्ग झाले. त्याच्याबद्दलच्या नोंदी सापडल्यास मी हजर करेन. संपुर्ण उता-यातील नोंदी खऱ्या व बरोबर आहेत. सी.बी.एस. कोअर बॅकींगचे सॉफ्टवेअर आमच्या बॅकेतील संगणकावर इनस्टॉल केले आहे. या संगणकांचा पासवर्ड माझ्याकडे आहे. आमच्या बॅकेतील अकाउटंट आणि कॅशिअर यांच्याकडे सुध्दा त्यांचे पासवर्ड आहे. प्रत्येक संगणक लॉग इन करुन त्याचा वापर केल्याची बाब मला समजते. प्रत्येक अकाउंटचा त्या-त्या दिवसाचा डेटा फिड करुन सेव्ह केला की, त्यात पुन्हा बदल करणे अशक्य आहे कारण त्या पध्दतीने ते सॉफ्टवेअर बनवलेले आहे. बाहेरच्या बॅकांमधून आमच्या बॅकेमध्ये कोणत्याही ग्राहकाच्या खात्यावर आनलाईन आलेल्या रक्कमांचा तपशील, त्या रक्कमा कोणत्या बॅकेतून व कोणाच्या खात्यातून आल्या हे आम्हाला संगणकावर समजते. त्यांचे तपशील मी दाखल करु शकतो.

**<u>सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक:२९/०७/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.